# तालुका निवड समिती भुम जिल्हा उस्मानाबाद
# कोतवाल पदांची सरळसेवा भरती 2018

-------------------------------------------------------------------------------

**जाहीरात क्रमांक 2018/आस्था/को.भरती/ सिआर- 32** **दिनांक 12.06.2018**

तालुका निवड समिती भुम जिल्हा उस्मानाबाद यांचे मार्फत कोतवाल संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरील अर्ज दिनांक 12.06.2018 ते 30.06.2018 (सार्वजनिक सुटीचे दिवस वगळुन) पर्यत तहसिल कार्यालय भुम येथे कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. अर्जाचा नमुना उप विभागीय अधिकारी कार्यालय भुम,तहसिल कार्यालय भुम तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**प्रवर्गनिहाय रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

**कोतवाल संवर्गः- सध्याचे एकत्रित मानधन दरमहा रु.5000/-**

**(कोतवाल मानधन महाराष्ट्र शासन वेळोवेळी ठरवुन देईल त्या प्रमाणे राहील)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | अ.जा. | 0 | 0 | 0 |
| 2 | विजाअ | 0 | 1 | 1 |
| 3 | इ.मा.व. | 0 | 1 | 1 |
| 4 | वि.मा.प्र. | 0 | 1 | 1 |
| 5 | सर्वसाधारण | 2 | 4 | 6 |
| | एकुण | 2 | 7 | 9 |

**दिनांकः-12.06.2018**

**सदस्य सचिव**
**तालुका निवड समिती भुम**
**तथा तहसिलदार भुम**

# तालुका निवड समिती भुम जिल्हा उस्मानाबाद
# कोतवाल पदांची सरळसेवा भरती 2018

---------------------------------------------------------------------------------

जाहीरात क्रमांक 2018/आस्था/को.भरती/ सिआर- 32 दिनांक 11.06.2018

प्रति,

दैनिक लोकमत ,
जाहिरात व्यवस्थापक ,
उस्मानाबाद.

विषयः- कोतवाल पदांची सरळसेवा भरती 2018

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की , तालुका निवड समिती भूम जिल्हा उस्मानाबाद यांचेमार्फत कोतवाल संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात यासमवेत पाठविण्यात येत असून सदर जाहिरात दिनांक 12/06/2018 आपल्या वर्तमान पत्रात प्रसिध्द करावी वर्तमान पत्राची प्रत या कार्यालयास सादर करावी.

तहसिलदार भूम

## तालुका निवड समिती भुम जिल्हा उस्मानाबाद
## कोतवाल पदांची सरळसेवा भरती निवड प्रक्रीया 2018

---

जाहीरात क्रमांक 2018/आस्था/को.भरती/ सिआर- 32 दिनांक 12.06.2018

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्र के.ओटी 2012/प्र.क्र -432 /ई-10 दिनांक 05 सप्टेंबर 2013 नुसार व मा. जिल्हाधिकारी , उस्मानाबाद यांचे पत्र दिनांक 30/05/2018 अन्वये तहसीलदार भूम यांचे आस्थापनेवर अवर्गीकृत कोतवाल भरतीची प्रक्रीया विहीत पध्दतीनुसार पुर्ण करण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत त्यानुसार तहसिलदार भूम यांचे आस्थापनेवरील रिक्त कोतवाल पदासाठी खालील नमुद केलेल्या संवर्गातील पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

कोतवाल संवर्गातील रिक्त पदांचे आरक्षण

मासिक एकत्रित मानधन दरमहा रु. 5000/- एकुण पदे -09

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | अ.जा. | 0 | 0 | 0 |
| 2 | विजाअ | 0 | 1 | 1 |
| 3 | इ.मा.व. | 0 | 1 | 1 |
| 4 | वि.मा.प्र. | 0 | 1 | 1 |
| 5 | सर्वसाधारण | 2 | 4 | 6 |
| | एकुण | 2 | 7 | 9 |

टिपः- 1 पदांच्या एकुण संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

2 महिलांसाठी 30 % आरक्षित पदांवर महिला उमेदवार न मिळाल्यास त्या- त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून सदर पदे भरण्यात येतील.

### अटी व शर्ती

1. शैक्षणिक अर्हता
   - 1.1 उमेदवार किमान 4 थी उत्तीर्ण (पास) असावा.
   - 1.2 उमेदवारास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.

2. **वयोमर्यादा .**

   2.1 उमेदवारांचे वय दिनांक 12/06/2018 रोजी 18 ते 40 या दरम्यान असावे.

   2.2 कोतवाल हे पद वर्ग-4 संवर्गात मोडत नाही. व अवर्गीकृत असल्यामुळे अपंग, प्रकल्प /भकंपग्रस्त , अंशकालीन , खेळाडू , माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेली वयोमर्यादेतील शिथीलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागू असणार नाही.

   2.3 उमेदवारास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक 01/07/2005 नुसार म.ना.से (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र ) सादर करणे आवश्यक राहील.

3. उमेदवार हा भूम तालुक्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. निवड झालेल्या उमेदवारांनी शारिरीक क्षमतेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल . व चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
5. या जाहिराती अन्वये करण्यात येणारी भरती संपुर्ण तालुका हा एक घटक गृहीत धरुन करण्यात येत असल्यामुळे निवड होणा-या उमेदवारांच्या नियुक्तीसाठी त्यांच्या रहाण्याच्या ठिकाणाचा कोणताही विचार न करता तालुका अंतर्गत रिक्त असलेल्या कोणत्याही ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. व तालुका अंतर्गत बदलीस पात्र राहतील. याबाबत निवड झालेल्या उमेदवारास रुपये 100/- चे बंधपत्र देणे आवश्यक राहील.
6. उमेदवारांची नियुक्ती केवळ तात्पुरत्या कालावधीसाठी राहील.
7. कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्यामुळे सेवा निवृत्तीविषयक लाभ मिळणार नाहीत.
8. मागासवर्गीय उमेदवारांनी समक्ष अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र अंतीम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड होणा-या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन , सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्रमांक 2011/प्र.क्र1064/2011/16-ब दिनांक 12/12/2011 अन्वये सबंधित उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून तात्पूरती नियुक्ती दिली जाईल. जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यात आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र /शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा संपुष्टात आणण्यात येवून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
9. अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती वगळून अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी 2018-19 या वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित प्रत साक्षांकित करून आवेदन पत्रासोबत जोडावी. (नॉन क्रिमीलेअर चे तत्व अनुसुचित जाती / जमाती या प्रवर्गा व्यतीरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.)

**10. महिला उमेदवारांकरिता**

10.1 उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय असणार नाही.

10.2 मागास वर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग , वि.जा (अ) , भ.ज (ब) , भ.ज (क) भ.ज (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी 30 टक्के आरक्षणाचा लाभ मिळणेसाठी क्रिमिलेअर गटात मोडत नसल्याने प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित प्रत साक्षांकित प्रत साक्षांकित करून अर्जासोबत जोडावी व मुळ प्रमाणपत्र अंतीम निवडीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. सदर प्रमाणपत्र 31.03.2019 पर्यंत वैध असणे आवश्यक आहे.

**11. परिक्षा शुल्क**

| मागासवर्गीय उमेदवारांकरिता | खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता |
|---|---|
| रुपये 200/- | रुपये 400/- |

वरील प्रमाणे परिक्षा शुल्क **“तहसिलदार भूम”** या नावे राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी (डिमांड ड्राफ्ट ) अर्जासोबत सादर करावा. (परिक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)

12 निवड पध्दती

12.1 शासन निर्णय दिनांक 05.09.2013 लेखी परिक्षा 75 गुणांची , व तोंडी 25 गुणांची अशी एकुण 100 गुणांची परीक्षा असेल.

12.2 लेखी परिक्षा दिनांक 15.07.2018 रोजी भूम मुख्यालयी राहील.

12.3 गुणवत्ता क्रम हा लेखी व तोंडी परिक्षेत मिळालेले गुण म्हणजेच एकुण 100 गुणांपैंकी मिळालेल्या गुणाच्या आधारवर असेल.

12.4 लेखी प्रश्नपत्रिका इयत्ता 4 थी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत वस्तनिष्ठ भहूपर्यायी स्वरुपाची असेल.

12.5 लेखी परिक्षेत सामान्य ज्ञान , अंकगणित , मराठी भाषा , विषय व जिल्हयाची भौगोलिक माहीती याचा समावेश राहील.

12.6 लेखी व तोंडी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्ता धारण करणा-या उमेदवारांना मुळ कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसिध्द केली जाईल.

12.7 अंतिम गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारांना सम समान गुण प्राप्त झाल्यास उमेदवारांची निवड शासन निर्णय दिनांक 27/06/2008 अन्वये करण्यात येईल.

13 **अर्ज कसा करावा.**

13.1 सदर पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना उपविभागीय कार्यालय भूम , तहसिल कार्यालय भूम. येथे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर ( http://www.osmanabad.nic.in) उपलब्ध आहे.

13.2 जाहिराती सोबत प्रसिध्द करण्यात येत असलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज त्यामधील माहीती /तपशिल सुस्पष्टपणे नमूद करुन सादर करावा.

13.3 अर्जासोबत स्वतःचे नाव व पत्ता नमुद केलेला व रू. 5/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा

13.4 उमेदवाराने त्याचे अलीकडील काळातील छायाचित्र आवेदनपत्रावर विहीत जागी स्वसाक्षांकीत करून घट्ट चिटकवावे.

13.5 शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात.

13.6 अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करून जोडावी.

13.7 अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती व्यतिरीक्त सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

13.8 महिला उमेदवारांनी 30 टक्के महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2017-18 या वर्षाचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

13.9 महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile ) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

**14.अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख व कार्यालयाचा पत्ता**

14.1 उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज सहपत्रांसह तहसिल कार्यालय , भूम येथे समक्ष अथवा पोष्टाने दिनांक 30/06/2018 पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा बेताने दाखल करावेत.

14.2 विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. व त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच या सबंधाने उमेदवारासमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

15. विहीत नमुन्यातील नसलेले अर्ज , विहीत शुल्क भरणा न केलेल्या उमेदवारांचे अर्ज

,विहीत शैक्षणिक अर्हता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज , अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज , फोटो नसलेला व स्वसाक्षांकित न केलेला अर्ज आणि विहीत मूदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात  घेतले जाणार नाहीत.व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

16. या जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी शासनाकडे , जिल्हाधिकारी कार्यालयास , उपविभागीय कार्यालयास किंवा तहसिल कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

17. प्राप्त झालेल्या अर्जाची छाणनी अंती पात्र / अपात्र उमेदवारांच्या याद्या तहसिल कार्यालय भूम तसेच उपविभागीय अधिकारी भूम यांचे नोटीस बोर्डावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

18 पात्र असलेल्या उमेदवारांना परिक्षेचे स्थळ व वेळ प्रवेशपत्राव्दारे लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

19. लेखी परिक्षेसाठी उमेदवारांनी प्रवेशपत्राच्या मागील बाजूस दिलेल्या सुचनांचे काटेकोर पणे पालन करणे आवश्यक आहे.

20  ज्या उमेदवारांना पोष्टाने प्रवेशपत्र प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांनी ठरवून दिलेल्या कालावधीत तहसिल कार्यालय भूम येथून प्रवेशपत्र हस्तगत करावे.

21 **उत्तर तालिका व मुलाखती**

21.1 प्राथमिक उत्तर तालिका तहसिल कार्यालय भूम , उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

21.2 लेखी परिक्षेचा निकाल व तोंडी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या आसन क्रमांची यादी तहसिल कार्यालय भूम , उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम येथील नोटीस बोर्डावर तसेच प्रसिध्द करण्यात येईल. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

21.3 मुळ कागदपत्राची पडताळणी व मुलाखती उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम येथे होईल.

21.4 मुलाखतीनंतर अंतिम निवड यादी तहसिल कार्यालय भूम , उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल , जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

**22 कोतवाल भरतीचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | बाब | कालावधी (दिनांक ) | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | अर्ज दाखल करणे | दिनांक 12.06.2018 ते 30.06.2018 (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून ) | कार्यालयीन वेळेत. | तहसिल कार्यालय भूम |
| 2 | लेखी परिक्षेसाठी पात्र/ अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक 03/07/2018 | कार्यालयीन वेळेत | 1.तहसिल कार्यालय भूम , 2.उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम 3.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल. |
| 3 | ज्यांना प्रवेश पत्र पोष्टाने प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांना तहसिल कार्यालयातून प्रवेशपत्र देणे | दिनांक 12.07.2018 व 30.07.2018 | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय भूम |
| 4 | लेखी परिक्षा | दिनांक 15.07.2018 | सकाळी 11.00 ते 12.30 | प्रवेशपत्राव्दारे पोष्टाने कळविण्यात येईल. |
| 5 | प्राथमिक उत्तर पत्रिका प्रसिध्द करणे . | दिनांक 16.07.2018 | सायंकाळी 5.00 वाजता | 1.तहसिल कार्यालय भूम , 2.उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम 3.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | करण्यात येईल. |
| 6 | प्राथमिक उत्तर पत्रिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सादर करणे | दिनांक 17.07.2018 ते 19.07.2018 | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय भूम . |
| 7 | अंतिम उत्तर तालीका प्रसिध्द करणे | दिनांक 20.07..2018 | कार्यालयीन वेळेत | 1.तहसिल कार्यालय भूम , 2.उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम 3.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल. |
| 8 | लेखी परिक्षेतील गुणवत्ता क्रमानुसार तोंडी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची अटी व शर्तीच्या आधिन राहून तात्पूरती यादी प्रसिध्द करणे | दिनांक 23.07.2018 | कार्यालयीन वेळेत | 1.तहसिल कार्यालय भूम , 2.उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम 3.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल. |
| 9 | मुळ कागदपत्राची पडताळणी व मुलाखती | दिनांक 26.07.2018 | कार्यालयीन वेळेत | उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम |
| 10 | अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे | दिनांक 30.07.2018 | कार्यालयीन वेळेत | 1.तहसिल कार्यालय भूम , 2.उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम 3.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http:// www.osmanbad.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल. |

23. काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास निवड प्रक्रिया स्थगित किंवा रद्द करण्याचे संपुर्ण अधिकारी निवड समितीस राहतील.

24 उमेदवारांने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अपात्र ठरवून उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

25 अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे किंवा असे नाही.

26 लेखी परिक्षा व मुलाखतीसाठी येण्याजाण्याचा खर्च स्वतः करावा लागेल.

27.सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचा नमुना उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम , तहसिल कार्यालय भूम , पंचायत समिती भूम व भूम तालुक्याच्या प्रत्येक ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

28. सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचा नमुना www.osmanabad.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**दिनांक 11/06/2018**

**स्थळः- भूम**

स्वाक्षरीत/-

**अध्यक्ष**

**तालुका निवड समिती**

**तथा,उपविभागीय अधिकारी भूम**

स्वाक्षरीत/-

**सदस्य सचिव**

**तालुका निवड समिती**

**तथा , तहसिलदार भूम**

# कोतवाल पदासाठी अर्जाचा नमुना

उमेदवारानी स्वतःचे अलीकडील छायाचित्र चिटकवून त्यावर स्वतःची स्वाक्षरी करावी.

| | |
|---|---|
| **अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक** | |
| **जातीचा प्रवर्ग** | |

प्रति ,

मा. अध्यक्ष तालुका निवड समिती भूम
ता.भूम जिल्हा उस्मानाबाद.

विषयः- कोतवाल पदी नेमणूक होणेबाबत .

महोदय ,

आपले कार्यालयाचे जाहिरात 01/2018 ला अनूसरून मी -------------------------------------- ता. ----------------------- ता .भूम जिल्हा उस्मानाबाद येथील रहिवासी असून कोतवाल पदी नेमणूक होणेसाठी अर्ज करित असून माझा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. अर्जदाराचे संपुर्ण नावः- ------------------------------------------------------------------
2. अर्जदाराचे मुळ रहिवासी गावाचे नावः- -------------------------------------------------
3. अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ताः -------------------------------------------------
   -------------------------------------------------
   --------------------- मोबाईल क्र. -------------
4. अर्जदाराचा जन्म दिनांकः- ----------------------------------------------------------------
5. अर्जदारांचे दिनांक 12/06/2018 रोजीचे वयः---------दिवस ----- महिने ----- वर्षे ------
6. अर्जदाराचा जातीचा प्रवर्ग( लागू असलेल्या प्रवर्गाच्या रकान्यात ( ) अशी खूण करावी

| अ.जा | अ.जमाती | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र | इ.मा.व | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

7. अर्जदार पुरुष / स्त्री आहे काय ?.                    पुरुष / स्त्री
8. उमेदवार विवाहीत आहे किंवा अविवाहीतः-
9. अर्जदाराची शैक्षणिक पात्रताः-

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता | महाविद्यालयीन /बोर्ड | एकुण गुण | प्राप्त गुण | उतीर्ण वर्षे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |

10 कोतवालाचे वारस आहेत काय ?                    होय / नाही ( पुरावा जोडावा)

11 सोबत जोडावयाचे कागदपत्रे

1 महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र होय / नाही

2 वयाचा (टिसी /सनद /इत्यादी) पुरावा

3 शैक्षणिक अर्हतेचा पुरावा

4 जात प्रमाणपत्राची छायांकित प्रत (मागासवर्गीय उमेदवार असल्यास)

5 जात वैधता प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास)

6 उत्पन्न / प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र

7 लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

8 परिक्षा शुल्क ( राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी )

बॅकेचे नाव                    शाखा                    रुपये

डी. डी क्रमांक                    दिनांक

मी याद्वारे प्रमाणित करतो / करते की , माझ्या माहीतीनुसार वरील तपशील सत्य आणि अचुक आहे या माहितीतील कोणताही तपशील चुकीचा / खोटा आढळल्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल. व माझ्यावर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणिव आहे.

दिनांकः-   ---------------

ठिकाणः-   ---------------                    **उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

**प्रतिज्ञापत्र**

**मी श्री/ श्रीमती ------------------------------------------------------------------- (स्वतःचे नाव)**

**श्री --------------------------------------------------- (वडीलांचे / पतीचे नाव ) यांचा/ यांची मुलगा/ मुलगी / पत्नी ) खालील प्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो / सांगते आणि घोषित करतो / करते की ,**

**1.मी ------------------------------------ कोतवाल पदाची सरळ सेवा भरती निवड प्रक्रीया 2018 साठी अर्ज भरला आहे.**

**2. मला आज रोजी असलेल्या आपत्याची संख्या ------ इतकी आहे. त्यापैंकी दिनांक 28 एप्रिल 2005 नंतर जन्मलेल्या माझ्या आपत्यांची संख्या ---- इतकी आहे .(असल्यास त्यांच्या जन्मतारखा नमुद करावयात )**

**3. दिनांक 28 एप्रिल 2005 नंतर माझ्या एकुण मुलांच्या संख्येत भर पडून ती दोन पेक्षा जास्त झाल्यास मी कोतवाल पदांची सरळ सेवा भरती निवड प्रक्रिया 2018 साठी अपात्र ठरेल याची मला जाणिव आहे.**

दिनांकः- ---------------

ठिकाणः- ---------------

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**